यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao Chavan Maharashtra Open University
Nashik, Maharashtra, India
ज्ञानगंगा घरोघरी

# सावित्रीबाई फुले अध्यासन

## अहवाल: सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने स्पर्धा परीक्षेविषयी व्याखान

संसाधन व्यक्ती: मा. संगीता धायगुडे
(माजी आयुक्त, लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या)

व्याख्यानाचा विषय: 'स्पर्धा परीक्षा आव्हाने, तयारी आणि यश'

दिनांक: २ जानेवारी २०२३, वेळ: दुपारी चार वाजता
स्थळ: स्टुडिओ, दृक श्राव्य निर्मिती केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक




सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने मा. संगीता धायगुडे यांचे स्वागत करतांना
अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर व अध्यासंनाचे सदस्य

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२**
**अंतर्गत संज्ञापन पत्र**

प्रेषक: डॉ. चेतना कामळस्कर

विषय: 'स्पर्धा परीक्षा आव्हाने, तयारी आणि यश' या विषयावरील व्याख्यान आयोजित व रेकॉर्डिंग करण्याबाबत..

प्रति: प्रमुख, दृक श्राव्य निर्मिती केंद्र

दिनांक: २०/१२/२०२२

जावक क्र- यचममुवि /साफुअ/२०२२/१२.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने, दिनांक ३ जानेवारी २०२३, सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमानिमित्त श्रीमती संगीता धायगुडे [Ex Regional Deputy Commissioner (Nashik)] या आपल्या विद्यापीठात येणार आहेत. महाराष्ट्र शासनात त्यांनी केलेल्या भरीव प्रशासकीय कामगिरीबद्दल आणि एमपीएससी परीक्षेसाठीच्या मार्गदर्शनाबद्दल आपल्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होण्यासाठीचे एक उत्स्फूर्त व्याख्यान ( ४० -४५ मि.) दृक श्राव्य निर्मिती केंद्रातील स्टुडिओत आयोजित करण्यात यावे.

व्यक्ते: श्रीमती संगीता धायगुडे

व्याख्यानाचा विषय : 'स्पर्धा परीक्षा आव्हाने, तयारी आणि यश'
दिनांक: २ जानेवारी २०२३, वेळ: दुपारी चार वाजता

तरी कृपया सदरच्या कार्यक्रमाला आपण योग्य ते सहकार्य करावे ही नम्र विनंती.

Kamlaskar

डॉ. चेतना कामळस्कर

प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

मार्फत:
मा. कुलसचिव :

O/C

By hand given
to Sapnar Sir.
23/12/22

महाराष्ट्रात महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी रोजी झाला आणि या वर्षी त्यांची १९२ वी जयंती आहे. यानिमित्ताने जयंतीच्या पूर्वसंध्येला, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने माजी आयुक्त व प्रसिद्ध लेखिका संगीता उत्तम धायगुडे मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. MPSC स्पर्धा परीक्षा देण्याची आयुष्यातील पहिली आणि शेवटची संधी असताना पहिल्याच प्रयत्नात MPSC परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झालेल्या माननीय संगीता धायगुडे मॅडम यांनी महाराष्ट्र राज्य सरकारमध्ये महत्त्वपूर्ण प्रशासकीय कामगिरी केली आहे. त्यांच्या अनुभवाचे, संघर्षातून मिळालेल्या यशाचे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्यासाठी विद्यापीठातील दृक्-श्राव्य केंद्रातील स्टुडिओमध्ये 'स्पर्धा परीक्षेची आव्हाने, तयारी आणि यश' या विषयावर दिनांक २ जानेवारी २०२३, संध्याकाळी ४ वा. उत्स्फूर्त व्याख्यानाचे (सुमारे 50 मिनिटे) रेकॉर्डिंग करण्यात आले. या विद्यापीठाच्या दृक्-श्राव्य केंद्रातील स्टुडिओमध्ये सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर आणि  टीम सदस्यांनी मा. संगीता धायगुडे यांचे स्वागत केले. स्नेहा राठोड यांनी संगीता धायगुडे मॅडम यांचा संक्षिप्त परिचय करून देत दिवसेंदिवस स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे आव्हानात्मक होत असल्याने आत्मविश्वास टिकवून ठेवण्यासाठी आणि सकारात्मक राहण्यासाठी प्रेरक व्याख्यानाची गरज असल्याचे अधोरेखित केले.

मा. संगीता धायगुडे मॅडम यांनी आपल्या व्याख्यानात सद्य स्थितीचा आढावा मांडताना एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विविध क्षेत्रातील उमेदवार अनेक वर्षे मेहनत घेतात, परंतु त्यात काही मोजकेच यशस्वी होतात. त्यामुळे परीक्षेत यशस्वी होण्यासाठी अभ्यासाचे नियोजनबद्ध धोरण आखणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आयुष्यात यशस्वी होण्याचा संदेश स्वतःच्या उदाहरणातून देत ‘स्वप्न, संधी आणि साध्य’ या त्रिसूत्रीचा योग्य वापर करण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या भाषणात त्या म्हणाला की, सकारात्मक आणि ध्येयाभिमुख वृत्ती असेल तर परिस्थिती कधीही अडसर होत नाही. स्पर्धा परीक्षांमध्येही यश मिळवण्यासाठी सकारात्मक आणि ध्येयाभिमुख वृत्ती खूप महत्वाची आहे. स्पर्धा परीक्षा (MPSC/UPSC) देणाऱ्या विद्यार्थांना, काय वाचावे, किती वाचावे व कोठून वाचावे याबद्दल गोंधळ असतो. हा धागा अचूक ओळखून, कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त अभ्यास कसा करायचा, योग्य नियोजन, योग्य दिशेने तयारी केल्यास स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे फार कठीण नाही असे मत व्यक्त केले. त्यांनी व्याख्यानात वैयक्तिक अनुभव आणि स्वप्रेरणा यावर भर दिला, जे प्रत्येकाला जीवनात नवीन शिकण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी उपयुक्त आणि मार्गदर्शकच आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीच्या पूर्वसंध्येला आदरणीय संगिता धायगुडे मॅडम यांनी त्यांच्या खास शैलीतून या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना, विशेषत: विद्यार्थिनींना केलेल्या सखोल मार्गदर्शनाबद्दल डॉ. चेतना कामळस्कर यांनी अध्यासनाच्या वतीने आभार व्यक्त केले. मा.

संगीता धायगुडे मॅडम यांनी जिद्द आणि चिकाटीने MPSC परीक्षा देण्याची त्यांच्या आयुष्यातील पहिली आणि शेवटची संधी असताना मोजकी जोखीम पत्करून यश संपादन केले व यावर आधारित धायगुडे मॅडम लिखित 'स्वत्व परीक्षा' पुस्तक उपलब्ध असल्याचे नमूद करत डॉ. चेतना कामळस्कर यांनी MPSC ची परीक्षा देणार्यांनी 'स्वत्व परीक्षा' हे पुस्तक एकदातरी जरूर वाचावे असे आवाहन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्नेहा राठोड, प्रमोद पवार, डॉ. दयाराम पवार, सचिन शिंदे, माधुरी देशपांडे, माधुरी खर्जुल, कविता देव, अंजली ताजनपुरे, भावना भाऊरकर, दयानंद हत्तीअंबीरे, दत्ता पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले. तसेच दृक-श्राव्य विभाग प्रमुख श्री. अभय कुलकर्णी, निर्मिती सहाय्यक श्री. प्रकाश सापनार, कॅमेरामॅन श्री. सचिन कटारे व इतर सर्व सहकार्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला. मा. संगीता धायगुडे यांच्या 'स्पर्धा परीक्षेची आव्हाने, तयारी आणि यश' या विषयावरील व्याख्यानाच्या अहवाला संदर्भातील कार्यक्रमाची रूपरेषा आणि छायाचित्रे सोबत जोडले आहेत. व्याख्यानाचे रेकॉर्डिंग YCMOU YouTube Channel [https://youtu.be/xALhfxcqy5Y] वर सर्वांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

## *Report on 'Competitive Exam Challenges, Preparation and Success'*

Krantijyoti Savitribai Phule, who was influential in Maharashtra's social reform and women's education, was born on January 3, and this year, in 2023, commemorates her $192^{th}$ birth anniversary. On the eve of Krantijyoti Savitribai Phule's birth anniversary, Savitribai Phule Adhyasan of Yashwantrao Chavan Maharashtra Open University hosted a lecture by former commissioner and renowned author Hon. Sangita Uttam Dhaigude. Hon. Sangita Dhaigude Madam, who had successfully passed the MPSC examination in the first attempt when it was her first and last chance in her life to appear for the MPSC examination and has made significant administrative achievements in the Maharashtra State. Therefore, a recording of an impromptu lecture (about 50 minutes) was done with the following information in the studio of the Audio Video Center (AVC) to inspire and provide guidance to this university learner:

**Resource Person**: Hon. Sangita Dhaigude, former commissioner
**Topic of Lecture**: 'Competitive Exam Challenges, Preparation and Success'
**Date**: January 2, 2023, **Time**: 4 PM

Dr. Chetana Kamlaskar, Head of Savitribai Phule Adhyasan and team members have welcomed Hon. Sangita Dhaigude in the AVC studio of this university. Sneha Rathod

gave a brief introduction of Hon. Sangita Dhaigude madam and highlighted the need for motivational lectures to maintain self-confidence and stay positive as success in the competitive exams becomes challenging day by day.

Hon. Sangita Dhaigude Madam stated in her speech that candidates from various fields work hard for many years to crack the MPSC exam, but only a few succeed. So, it is essential to strategize the study methodology to succeed in the exams. Madam has given the message of success in life through her own example, advised making proper use of the triad of 'Dream, Opportunity, and Achievement’. Hon. Sangita Dhaigude Madam specified in her speech that the situation will never difficult with a positive and a goal-oriented attitude. This is equally important to succeed in competitive exams. Students appearing for MPSC/UPSC are in dilemma about what to study, how to study and from where to study. Considering this fact, to do maximum study in minimum time, proper planning in the right direction is essential then only it would not be very difficult to achieve success in the competitive exams. She has given emphasis on her own experiences and self-motivation which is useful for everyone to learn from and move forward in their life.

Today on the eve of Krantijyoti Savitribai Phule Jayanti, Dr Chetana Kamlaskar expressed thanks to Hon. Sangita Dhaygude madam who has created the `world from nothing’, for her valuable and profound guidance to the students of this university, especially the girl students. As Hon'ble Sangita Dhaygude madam has achieved success with determination and perseverance by taking a calculated risk when it was the first and last chance in her life to take the MPSC exam. She has also written the book 'Swatva Pariksha' based on her own experiences. Dr. Chetana Kamlaskar expressed her opinion that MPSC candidates must read this book at least once.

On this occasion, we received timely guidance from the Hon. Registrar to make this program successful. Along with this, Sneha Rathod, Pramod Pawar, Dr. Dayaram Pawar, Sachin Shinde Madhuri Deshpande, Madhuri Kharjul, Kavita Dev, Anjali Tajanpure, Bhavna Bhaurkar, Dayanand Hattiambire, and Datta Patil made special efforts to ensure the program's success. The Head of Audio-Visual Center Mr. Abhay Kulkarni, Production Assistant Mr. Prakash Sapnar, Cameraman Mr. Katare Sachin, and all the colleagues of the Audio-Visual Center, were supported to make the program successful.

This report of Hon. Sangita Dhaigude’s talk on 'Competitive Exam Challenges, Preparation and Success' along with the schedule and photographs/link are attached herewith. The recorded video is available on YCMOU YouTube Channel [https://youtu.be/xALhfxcqy5Y] for everyone.

Dr. Chetana Kamlaskar

Head, Savitribai Phule Adhyasan



मा. संगीता धायगुडे यांची ओळख करून देताना स्नेहा राठोड...



मा. संगीता धायगुडे यांचे व्याख्यान रेकॉर्डिंग करतांना...



माजी आयुक्त मा. संगीता धायगुडे मॅडम समवेत डॉ. चेतना कामळस्कर...



माजी आयुक्त मा. संगीता धायगुडे मॅडम, अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर,
निर्मिती सहाय्यक श्री. प्रकाश सापनार व कॅमेरामॅन श्री. सचिन कटारे...



माजी आयुक्त मा. संगीता धायगुडे, अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर, समन्वयक श्री प्रमोद पवार
व निर्मिती सहाय्यक श्री. प्रकाश सापनार ..